इंग्रजी

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र  जिल्हा District मुंबई  पोलीस ठाणे Police Station लाप्रवि  पहिली खबर क्र. FIR No. 12  वर्ष Year 2026  दिनांक Date 07/05/20[illegible]

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम  कलमे Sections 7, 12
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day बुधवार  तारीख पासून Date from 27/04/2026  वेळ Time 14:06  तारीख पर्यंत Date to 06/05/2026  वेळ Time 15:07

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००  (2) ०३.०० ते ०६.००  (3) ०६.०० ते ०९.००  (4) ०९.०० ते १२.००  (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.००  (7) १८.०० ते २१.००  (8) २१.०० ते २४.००

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.  तारीख Date 04/05/2026  वेळ Time 16:00

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ............  तारीख Date 07/05/2026  वेळ Time ............

4. माहितीचा प्रकार Type of Information ............ लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. पूर्वेस 18 किमी  चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ............

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name को.दक्षिणा वॉर्ड अंधेरी पूर्व मुंबई  ठिकाणाचे नंबर No. if any ............  गल्ली Ward ............  रस्त्याचे नाव Name of road ............

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name अनिल शित्तरवाड  (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name परशुराम शित्तरवाड
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 43 वर्षे  (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय  फोन नं. Phone No. ............
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ दिल्याचा दिनांक Date of issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation ............
   (g) धर्म Religion हिंदू  जात Caste ............ जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता Address पोलीस अधिकारी निवासस्थान, कार्टर रोड, वांद्रा वेस्ट, मुंबई  बि.नं. 1  गल्ली/सर्व्हे नं. Ward रुम नं. 1  घर/नाव नं. House Name No. ............ फोन/मो. नं. Phone No. ............ पॅन नं. Pan No. ............ वोटर्स नं. Card No. ............

रस्त्याचे नाव Road ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ पो. स्टे. P. Stn. ............

तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............ सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

① योगेश रमाकांत सावंत, वय - 51 वर्षे, पद- प्रभारी सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक, रा.ठी. रुम.नं. 39, सौरभ सोसायटी, दुसरा मजला, प्रार्थना समाज रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई - 400057
② सुधांत चंद्रकांत आंबरे, वय- 39 वर्षे, पद- कामगार रा.ठी. जुनी बी.डी.डी. चाळ क्र. 05, रुम.नं. 71, एस.एस. वाघ मार्ग, नायगाव दादर पूर्व. मुंबई - 400014 : दोन्ही के/दक्षिणा वॉर्ड



Scanned with OKEN Scanner

फिर्यादी पो.नि. अनिल घित्तरवाड यांचा फिर्यादी जबाब हा स्वतंत्र कागदावर टंकलिखित करण्यात आला असून त्यालाच प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(सुनिल टाऊगडे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

अनिल परशुराम घित्तरवाड
पोलीस निरीक्षक,
लाप्रवि, कार्यालय, मुंबई

Scanned with OKEN Scanner

दिनांक ०७/०५/२०२६

फिर्याद

मी, अनिल परशुराम चित्तरवाड, वय ४३ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक – लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मोबाईल नंबर ८९७५८९५६५६.

---

मी वरील प्रमाणे असून, ऑगस्ट २०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.

मी मंगळवार, दिनांक ०४/०५/२०२६ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्रमांक ३०/२०२६ मध्ये पडताळणी व सापळा कारवाईकरीता चौकशी अधिकारी म्हणून माझी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सहाय्यक पोलीस आयुक्त, सुनिल हारूगडे यांची नेमणुक केल्याबाबत आदेश मिळाला. नमुद पडताळणीमधील तक्रारदार श्री. अक्षय धाकल्या शिर्के, वय ३१ वर्षे, धंदा: सफाई कामगार, अंधेरी के/दक्षिण वॉर्ड, मनपा, मुंबई. रा.ठि.ए.विंग,रु.नं. ४०२,बि.नं.०२,सोलंकी पार्क, हनुमान मंदिराच्या बाजुला, नवघर रोड, भाईंदर पुर्व, ठाणे आहेत. तक्रारदार श्री. अक्षय धाकल्या शिर्के यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. तेव्हा तक्रारदार यांनी सांगितले की, तक्रारदार श्री अक्षय धाकल्या शिर्के हे दिनांक ०२/०१/२०१९ पासुन त्यांचे वडील नामे श्री धाकल्या नामदेव शिर्के यांचे सेवानिवृत्ती नंतर सफाई कामगार म्हणुन अंधेरी पुर्व, के/दक्षिण विभाग अंतर्गत सहार स्लम चौकी येथे सफाई कामगार म्हणुन कर्तव्य बजावत आहेत.

एप्रिल २०२६ मध्ये तक्रारदार यांना यांचे सहकारी स्टाफ मार्फत समजले की, त्यांचा परमनंन्ट ऑर्डर नंबर के/दक्षिण वॉर्ड, अंधेरी येथे आलेला आहे. त्याबाबत त्यांनी खातरजमा करण्यासाठी श्री. योगेश रमाकांत सावंत, प्रभारी सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक यांना दि.२७/०४/२०२६ रोजी समक्ष जावुन भेटले. श्री सावंत यांनी तक्रारदार यांना त्यांचा परमनंन्ट ऑर्डर नंबर आल्याबाबत सांगितले. तक्रारदार यांनी श्री.योगेश सावंत यांना नेमणुकीबाबत परमनंन्ट ऑर्डर मिळण्यासाठी विनंती केली. त्यावेळी प्रभारी सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक, श्री योगेश सावंत यांनी तक्रारदार यांचेकडे नेमणुकीची परमनंन्ट ऑर्डर काढण्यासाठी कोणतीही कायदेशीर फी नसताना रु.१५,०००/– (पंधरा हजार रुपये) दयावे लागतील अशी लाचेची मागणी केली. त्यांनतर तक्रारदार हे श्री योगेश सावंत यांना दि. ३०/०४/२०२६ रोजी पुन्हा समक्ष जावुन भेटले तेव्हा श्री.योगेश सावंत यांनी तक्रारदारांना त्यांचे हाताखाली काम करणारे मदतनीस श्री सुशांत चंद्रकांत गमरे, लेबर, (टायपिस्ट) यांना भेटण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार श्री सुशांत गमरे यांना जावुन भेटले असता. श्री.गमरे यांनी त्यांना रु. १५,०००/– आणले का? याबाबत विचारणा केली, तक्रारदारांनी त्यांना पैसे नसलेबाबत सांगितले तेव्हा योगेश सावंत यांनी तक्रारदार यांना दि.०६/०५/२०२६ रोजी पैसे घेवुन आल्यानंतरच ऑर्डर मिळेल असे सांगून लाचेची मागणी केली.

तक्रारदार श्री. अक्षय शिर्के यांची श्री.योगेश सावंत, प्रभारी सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक आणि मदतनीस श्री सुशांत चंद्रकांत गमरे, लेबर (टायपिस्ट) यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक ०४/०५/२०२६ रोजी लेखी तक्रार अर्ज दिला. तक्रारदार हे लाप्रवि मुंबई कार्यालयास सायंकाळी उशीरा आल्याने तसेच तक्रारदार यांचेकडे विचारणा केली असता. लोकसेवक यांचे कार्यालयात संध्याकाळी १७:०० वाजता नंतर कोणीही भेटत नाहीत अशी माहिती तक्रारदार यांनी दिल्याने दिनांक ०५/०५/२०२६ रोजी पडताळणी कारवाई करण्याचे ठरले.

दिनांक ०५/०५/२०२६ रोजी तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. शेमडकर यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री. दयानंद महादेव शिंदे वय ३५ वर्षे, व्यवसाय– नोकरी, (राज्यकर निरीक्षक), कार्यालय पत्ता– राज्यकर सह आयुक्त नोडल विभाग–१२ व लेखा परिक्षण–४ मुंबई. पत्ता:– प्लॉट नं ०३, फलॅट नं ३०९, भावेश्वर बेलिझा, करंजाडे, पनवेल मोबाईल क्र. ९८९०७३१९००, २) श्री. हितेश ज्ञानेश्वर ढोबळे, वय–३२ वर्षे,

Scanned with OKEN Scanner

व्यवसाय–नोकरी, (राज्यकर निरीक्षक), कार्यालय पत्ता – राज्यकर सह आयुक्त नोडल विभाग–१२ व लेखा परिक्षण–४ मुंबई, पत्ता– ४/सी, कोहिनुर टॉवर, न्यु हिंद म्हाडा कॉलनी, घोडपदेव कॉटनग्रीन मुंबई. मोबाईल क्र. ९६६५६५३८५८ यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचांचा तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून आम्ही व पर्यवेक्षण अधिकारी म्हणून सपोआ सुनिल हारूगडे तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

तद्नंतर सपोआ हारूगडे यांनी पंचासमक्ष सांगितले की, लोकसेवक यांनी केलेल्या लाचेच्या मागणी संदर्भात पडताळणी करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने तक्रारदार श्री. अक्षय धाकल्या शिर्के हे लोकसेवक यांची त्यांच्या कार्यालयात जावुन प्रत्यक्ष भेट घेणार आहेत.

त्यानंतर दिनांक ०५/०५/२०२६ रोजी १३:५०वा. तक्रारदार, दोन पंच व आम्ही पडताळणी पथक असे लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या दोन शासकीय वाहनाने लोकसेवक यांचे कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. तसेच मी शासकीय वाहन क्र.२ यातील पथकास पश्चिम द्रुतगती महामार्ग, विलेपार्ले परिसरात जावून थांबण्याच्या सुचना दिल्या. शासकीय वाहन क्र.१ ने आम्ही, पंच व तक्रारदार असे लोकसेवक यांचे कार्यालयापासून काही अंतरावर अंधेरी पुर्व परिसरात आल्यानंतर १४:२० वाजताचे दरम्यान शासकीय वाहन थांबविले.

त्यानंतर १४:३० वाजता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून आम्ही स्वत: तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बनियनला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही, अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. ०१ श्री. दयानंद शिंदे हे लोकसेवक यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. उर्वरीत पथक शासकीय वाहना जवळच थांबले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच श्री. शिंदे हे शासकीय वाहनाजवळ परत आले. सदरवेळी तक्रारदार यांचेकडे विचारणा केली असता असे समजले कि, लोकसेवक श्री योगेश सावंत व तक्रारदार अक्षय शिर्के यांची भेट झाली असून, सदरवेळी भेटीदरम्यान तक्रारदार यांनी त्यांचे नेमणुकीबाबतच्या कायमस्वरूपाची परमनंन्ट ऑर्डरबाबत लोकसेवक यांना विचारणा केली असता, त्यावेळी लोकसेवक यांनी ''काय, तुझ काय मुहूर्त नाय लागत ना'' असे पैश्याबाबत विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार लोकसेवक यांना रूपये १५,०००/– खुप होतात, असे म्हणाले, त्यावर लोकसेवक सावंत बोलले की, ''अरे ते पाच वर्षापासून चालू आहे, मी आज थोडीच केलय, पाच वर्ष झाले, तसच आहे'' असे म्हणाले, तक्रारदारांनी त्यांना रूपये १०,०००/– देतो असे सांगितले असता त्यांनी ''ठिक आहे, आता दहा दे नंतर थोडे दे बस..हा मग उदया हे कर, उदया घेवून ये ना, उदया करतो..हा ठिक आहे उदया घेवून ये जा, मी उदया ऑर्डर काढतो, असे लोकसेवक योगेश सावंत बोलले व लाचेच्या मागणीला होकार दिला. अशी लोकसेवक श्री सावंत व तक्रारदार शिर्के यांच्यात चर्चा झाल्याचे तक्रारदार यांनी सांगीतले. सदरबाबत कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, वरीलप्रमाणे समजून आले. त्यानंतर सर्व शासकीय वाहनाने लाप्रवि कार्यालयात परत आलो.

सदर पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक योगेश सावंत यांनी लाचेची मागणी केल्याचे तसेच लाचेची रक्कम दिनांक ०६/०५/२०२६ रोजी घेऊन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने सपोआ सुनिल हारूगडे व मी पडताळणी पथक, पंच व तक्रारदार यांना गोपनियतेच्या सुचना दिल्या व दिनांक ०५/०५/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली.

दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील सापळापुर्व/सापळा कारवाईकरीता देण्यात आलेल्या सुचनेप्रमाणे तक्रारदार, पंच व पथक असे सर्व लाप्रवि कार्यालयास हजर झाले. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये १०,०००/– इतकी रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. १०,०००/– (त्यामध्ये रू. ५००/– दराच्या भारतीय चलनाच्या २० नोटा) यांचा पंचासमक्ष लाप्रवि कार्यालयाच्या झेरॉक्स मशीन वर छायांकीत प्रत काढण्यात आले. सदर छायांकीत प्रतीवर समक्ष म्हणून मी तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी केली. त्यानंतर सपोआ सुनिल हारूगडे यांनी पंच व तक्रारदार यांना अॅन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. पोशिचा.गारळे यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रूपये १०,०००/– (त्यामध्ये रू. ५००/– दराच्या भारतीय चलनाच्या २० नोटा) रक्कमेच्या नोटांना अॅन्थ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार शिर्के यांनी परिधान केलेल्या शर्टच्या डाव्याबाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर पोशिचा गारळे हे सापळा कारवाईमध्ये प्रत्यक्ष भाग घेणार नसल्याचे सांगितले. तसेच लोकसेवक यांनी लाच स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी हातरूमाल चेहऱ्यावर फिरवून सापळा पथकाला दिसेल असा लाच स्विकारल्याचा इशारा करावा. तसेच सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना एकत्र करून खबरदारीच्या सुचना आम्ही दिल्या.

त्यानंतर तक्रारदार, दोन पंच व आम्ही पडताळणी पथक असे लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या दोन शासकीय वाहनाने लोकसेवक यांचे कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो. लोकसेवक यांचे कार्यालयापासून काही अंतरावर अंधेरी पुर्व परिसरात आल्यानंतर दोन्ही शासकीय वाहन थांबविण्यात आले.

मी व सपोआ हारूगडे यांनी तक्रारदार, पंच व पथक यांना सापळा कारवाईच्या आवश्यक त्या सुचना दिल्या. मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजुस बनियानला कोणास दिसणार नाही किंवा संशय येणार नाही अशा पध्दतीने अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.०१ श्री. दयानंद शिंदे हे लोकसेवक यांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या दिशेने रवाना झाले. त्यांच्या मागोमाग आम्ही पथक व पंच क्र.०२ श्री हितेश ढोबळे चालत गेलो. सपोआ हारूगडे व काही सापळा पथक हे ठरल्याप्रमाणे के/दक्षिण वार्ड, अंधेरी पुर्व, मनपा मुंबई कार्यालयाच्या आवारात कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे थांबून राहीलो. काही वेळाने लोकसेवक श्री योगेश सावंत हे बाहेरून आले व कार्यालयातील त्यांच्या केबीनमध्ये गेले. त्यानंतर तक्रारदार हे लोकसेवक सावंत यांना भेटण्याकरीता त्यांचे केबीनमध्ये गेले.

काही वेळाने तक्रारदार शिर्के हे केबीनच्या बाहेर आले व त्यांनी सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच मी व सोबतच्या सापळा पथकाने लागलीच लोकसेवक सावंत यांचे केबीनमध्ये प्रवेश केला. त्यावेळी तक्रारदार शिर्के यांनी केबीनमध्ये परत येवून लोकसेवक योगेश सांवत यांचे सांगणेवरून त्यांचे मदतनीस टायपिस्ट श्री सुशांत गमरे, पद–कामगार यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याचे सांगितले. त्यावेळी आम्ही व पथकाने लोकसेवक योगेश सांवत व त्याचे मदतनीस टायपिस्ट श्री सुशांत गमरे, पद–कामगार यांना १५.०७ वा. ताब्यात घेतले. सदरवेळी त्यांना त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्याचे नाव योगेश रमाकांत सावंत, वय ५१ वर्षे, पद– प्रभारी सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक, के/दक्षिण, घनकचरा व्यवस्थापन विभाग, मनपा, अंधेरी पुर्व, मुंबई राठि.३९, सौरभ सोसायटी, २रा मजला, प्रार्थना समाज रोड, विलेपार्ले पुर्व, मुंबई ४०००५७ व मदतनीस टायपिस्ट यांनी त्यांचे नाव सुशांत चंद्रकांत गमरे, वय ३९ वर्षे, पद– कामगार, के/दक्षिण, घनकचरा व्यवस्थापन विभाग, मनपा, अंधेरी पुर्व, मुंबई. राठि–जुनी बी.डी.डी.चाळ क्र.०५, रूम नं.७१, ३रा माळा, एस.एस.वाघ मार्ग, नायगाव, दादर (पुर्व), मुंबई असे सांगितले.

मी लोकसेवक योगेश रमाकांत सावंत यांस पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी सुशांत चंद्रकांत गमरे यांचेकडे लाचेची रक्कम असल्याचे सांगितले. लोकसेवक सुशांत चंद्रकांत गमरे यांना पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, लोकसेवक सुशांत गमरे यांनी लाचेची रक्कम त्यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या डाव्या खिश्यात ठेवल्याचे सांगून सदर लाचेची रक्कम परिधान केलेल्या पॅन्टच्या डाव्या खिश्यातून काढून पंचासमक्ष ठेवली. लोकसेवक सुशांत गमरे यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या

Scanned with OKEN Scanner

डाव्या खिशात मिळून आलेल्या लाचेच्या रकमेची पंचासमक्ष पहाणी केली असता, सदर लाचेच्या रक्कमेची व लाप्रवि कार्यालयातील झेरॉक्स मशीनवर काढण्यात आलेल्या लाचेच्या रकमेच्या छायांकीत प्रतीवरील क्रमांक तंतोतंत मिळून आले.

त्यानंतर लोकसेवक योगेश रमाकांत सावंत व लोकसेवक सुशांत चंद्रकांत गमरे यांचेसह लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तरी दिनांक ०५/०५/२०२६, आणि दि. ०६/०५/२०२६ रोजी केलेल्या पडताळणी/ सापळापुर्व/ सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक योगेश रमाकांत सावंत, पद-प्रभारी सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक, नेमणुक के/दक्षिण, घनकचरा व्यवस्थापन विभाग, अंधेरी (पुर्व), मुंबई यांनी अंधेरी के/दक्षिण वॉर्ड चे अंतर्गत सहार स्लम चौकी येथेच नेमणुकीची परमनंन्ट ऑर्डर मिळावी याकरीता तक्रारदार अक्षय शिर्के यांचेकडून रूपये १५,०००/-लाचेची मागणी करून स्विकारण्याचे कबुल केले. तसेच सदरची लाचेच्या रक्कमेपैकी पहिला हफ्ता रूपये १०,०००/- रक्कम लोकसेवक योगेश रमाकांत सावंत, पद- प्रभारी सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक यांच्या सांगण्यावरून लोकसेवक सुशांत चंद्रकांत गमरे, पद-कामगार दोन्ही नेमणुक के/दक्षिण, घनकचरा व्यवस्थापन विभाग, अंधेरी (पुर्व), मुंबई यांनी स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक योगेश रमाकांत सावंत, पद- प्रभारी सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक व लोकसेवक सुशांत चंद्रकांत गमरे, पद-कामगार दोन्ही नेमणुक के/दक्षिण, घनकचरा व्यवस्थापन विभाग, अंधेरी (पुर्व), मुंबई यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, १२ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(सुनिल हारूगडे)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

अनिल घेरडीकर
पोलीस निरीक्षक
लाप्रवि, मुंबई

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.......................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......................................

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार आदाय शिर्के यांची के पश्चिम वॉर्ड मनपा, मुंबई अंतर्गत सहार स्लम चौकी येथे नेमणुकीबाबतची परमनन्ट ऑर्डर करुन घेण्यासाठी आलोसे क्र.01 योगेश सावंत प्रभारी सहायक मुख्य पर्यवेक्षक यांनी 15,000/- रु. लाचेची मागणी केली. सदर मागणीस आलोसे क्र.2 सुहास गमरे अपप्रेरणा देवुन दि.06/05/2026 रोजी तक्रारदार यांचे-कडुन आलोसे क्र.1 सावंत यांचेकरिता 10,000/- रु.ची लाच स्वीकारली म्हणुन गु.र.क्र. 12/2026 कलम 7, 12 भ्र.प्र.अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : अमोल सोनवणे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

.......................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .................. जिल्हा .............. राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..................................................

(3) Transferred to P. S. ....................................
District .................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ... सुनिल हारुगडे ...
पदनाम Rank ... सहाय्यक पोलिस आयुक्त, लाप्रवि, मुंबई
तपासिक अ. चा कोड क्र. .............................
Posting
Code No. of I. O. .............................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 06/04/2026 ..........
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner